# दाभोळची – आयेशाबिबीची / शाही / माँसाहेब मशीद

**प्रा.रश्मी शिवाजी आडेकर .**
**खरे -ढेरे -भोसले महाविद्यालय,गुहागर**
**जि.- रत्नागिरी**
**मोबाईल -९४०३४६२२९९**

वास्तुशास्त्र म्हणजे गृहरचनाशास्त्र वस् = राहणे या धातूपासून ‘ वास्तु’ हा शब्द बनलेला आहे वास्तु या शब्दाचा अर्थ ‘निवासस्थान‘ एवढाच मर्यादित न राहता कालांतराने मंदिरे,प्रासाद, मनोरे,स्तंभ,गडकोट तलाव इ.चांगल्या किंवा भग्नावशेषरुपांत आढळतात,त्यांना वास्तुशिल्पे म्हणतात. वैदिक ग्रंथ,जैन ग्रंथ,बौध्द ग्रंथ,कौटिल्याचे अर्थशास्त्र,विश्वकर्माप्रकाश,पुराणें,मानसार इ,ग्रंथामधून वास्तुशास्त्रांचे उल्लेखमिळतात.

महाराष्ट्रातीलरत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यात दाभोळ हे गाव समुद्र किनारी असून उत्तरेस १७°३४°अंश आणि पूर्वेस ७३°१६° रेखांशावर आहे. भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर दाभोळइतके जुने आणि प्रसिद्ध बंदर नव्हते. टॉलेमीच्या सर्वात जुन्या नकाशात दाभोळचा उल्लेख आहे.दाभोळ प्राचीन काळी दालभ्यवती होती, महिकावती होती. नंतर ती हामजाबाद होती. मैमुनाबादही एक वेळ दाभोळचे नाव होते.विजयनगरच्या पराक्रमी सम्राटांचा अपवाद वगळता १३व्या शतकाच्या मध्यापासून ते १६ व्या शतकाच्या अखेरीस अधिककाळ मुस्लिम सत्ताचा अंमल दाभोळवर होता. दक्षिण भारतातील बहुसंख्य मुसलमान यात्रेकरू मक्केला जाण्यासाठी दाभोळ बंदारात येत असत. त्यामुळे दाभोळला बाबुलहिंद म्हणजे ‘मक्केचा दरवाजा’ असेही म्हणतात.शिवाय आदिलशाहीतील दाभोळ हे व्यापार केंद्र व बंदर म्हणून प्रसिद्ध होते.

इ.स.१३ व्या प्रारंभी दिल्लीवर मुस्लीम सत्ता सुरु झाल्यानंतरच मुस्लीम वास्तूंची निर्मिती सुरु झाली. इंडो -मुस्लीम कला आणि तुघलककालीन वास्तुशैलीची ओळख सुलतानशाहीतील महंमद तुघलकाच्या काळात त्याने केलेल्या इ.स.१३२७ मध्ये ‘राजधानी स्थलांतर‘ या अभिनव प्रयोगामुळे झाली.दक्षिणेत स्वतंत्र सत्ता म्हणून उदयास आलेल्या बहामनी राज्यात खऱ्याअर्थाने वास्तुकलेचा विकास तीन टप्प्यात झाला.

बहामनीवास्तुकलेत उत्तर हिंदुस्थानी व इराणी शैलीचा मिलाफ झालेला दिसून येतो. तिसरा टप्पा म्हणजे बहामनी या स्वतंत्र राज्याचा अस्त व अहमदनगर,विजापूर ,बिदर वऱ्हाड आणि गोवलकोंडा या पाच शाह्यांचा झालेला उदय यातूनच वास्तुकला पूर्णत्वाला पोहोचल्याचे दिसते. उत्तर हिंदुस्थानी,इराणी व स्थानिक हिंदू शैलीचा समन्वय तिला‘**दख्खनी शैली**’असे नाव पडले. दोन शैलीचे संमिश्रण झाले असलेतरी वास्तु बांधण्यात व दागदागिने घडविण्यात हिंदू शैलीचा वापर पूर्वी पेक्षाही जास्त करण्यात आला.एवढेच नव्हे तर तिच्यात ताजेपणा व प्रादेशिक वेगळेपणा आला.

## मशिद वास्तुकला

मिहराब व घुमट ही मुस्लीम वास्तुकलेची विशेष अंगे मानली जातात.पण तीदेखील प्राचीन भारतीय शिल्पकामात आढळतात.हिंदु मंदिरातील कमानीयुक्त देवळयावरून मिहराब व डेरेदार स्तूपावरून घुमट साकार झाला असावा असे पंडितांचे मत आहे.

मुस्लिमांच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनात **‘मशीद’** हा महत्वाचा घटक आहे. इस्लाम मध्ये सगुण साकार पण निराकार अल्लाहची संकल्पना पायाभूत असल्यामुळे त्याची उपासना व उपासनेचे स्वरूप याला महत्व आहे. नमाज हा इसलामी श्रध्देच्या पंचस्तंभापैकी एक असल्याने ती व्यक्तिगत पातळीवर तसेच सामुदायिकरित्या पढली जाते.

सामुदायिक प्रार्थना म्हणावयाची तर सर्वांना एकत्र येण्यासाठी सभागृहासारखी रचना असलेली प्रार्थनागृह निर्माण करणे ओघानेच आले. वास्तुशास्त्र आणि ध्वनीशास्त्र या दृष्टीने मशीद संकल्पना विकसित झाली. उपस्थितांमध्ये शिस्त व समन्वयासाठी नेतृत्व करण्यासाठी इमाम किंवा पेशिमाम ही संकल्पना अस्तित्वात आली. इमामाचे शब्दोच्चार सर्वांना ऐकू जातील अशा रीतीने मशिदीच्या अंतर्गत रचना करण्यात आली.दक्षिण भारतामध्ये हे ध्वनीशास्त्र खूपच विकसित झाले होते मशिदीच्या पश्चीमेकडील भिंतीच्या मध्यभागी साधारणपणे तीन फूट रुंद व सात ते आठ फूट उंच असलेली अर्धवर्तुळाकार पोकळी निर्माण करण्यात आली. तिलाच मिहिराब म्हणतात. या समोर उभे राहून इमाम नमाजींचे नेतृत्व करतो. त्याचे मंत्रोच्चार या अर्धवर्तुळाकार पोकळी घुमतात आणि ध्वनीशास्त्राच्या नियमानुसार परावर्तीत होऊन उपस्थितांना ऐकू येतात.या घुमणाऱ्या आवाजामुळे मशिदीच्या अंतर्भागात गुढरम्य आध्यात्मिक वातावरण निर्माण होऊन मन एकाग्र होते.

मशिद वास्तुकलाचा इतिहास पहावयास गेल्यास चौथा खलिफा हजरत अलीच्या निधनानंतर उमय्या घराण्याचा संस्थापक मुआवियाझाले. यांनी पश्चीमेकडील भिंतीत मिहिराब असलेली मशिद वास्तुशास्त्रीय संरचना इस्लामी जगताला महत्वपूर्ण आहे.उमय्या घराण्याचे योगदानहे आजही इस्लामी जगतामध्ये कायमस्वरूपी अस्तित्वात राहिले आहे. कोकणातील मशिदी पूर्वाभिमुखी असून नमाज पश्चीमेकडे तोंड करून (याला किबला असे म्हणतात) पढावयाची असते कारण इस्लामी जगतातील सर्वात महत्त्वाची काबा मशीद पश्चीमेकडे आहे

**आयेशाबिबीची / शाही / माँसाहेब मशीद:**

कोकणामध्ये सोळाव्या शतकात म्हणजे आदिलशाही राजवटीत निर्माण झालेल्या सर्व जुन्या वास्तूंमध्ये चांगल्या **स्थितीमधील** दोन मशिदींचा उल्लेख इतिहासात आढळतो. यातील एक म्हणजे चौलची हसाबा मशीद आणि दुसरी दापोलीत दाभोळ धक्क्यावर असलेली शाही मशीद. या मशिदीचा अंडा किंवा माँसाहेब**/ शाही** मशीद म्हणूनही उल्लेख केला जातो.

एवढी भव्य, एवढी देखणी आणि अद्यापही चांगल्या स्थितीत असलेली मशीद निदान कोकणपट्टीत तरी दुसरी नाही. इतिहासकाळातील ही कला-सौंदर्याची आणि भव्यतेचा साक्षात्कार घडविणारी शिल्पाकृती दाभोळचे मोठे आकर्षण आहे. ७०X६० फूट लांबी-रूंदी असलेल्या इमारतीला चार मिनार आहेत आणि 75 फूटांचा भव्य घुमट आहे.विजापूर येथील शाही जामा मशिदीची ती प्रतिकृती आहे. इराणी शैलीच्या या मशीदी बांधणी अतिशय रेखीव व प्रमाणबद्ध आहे तिच्या उंच जोत्याला प्रशस्त दगडी पायऱ्या आहेत.पायऱ्या चढून गेल्यावर शुचिर्भूत होण्यासाठी हौद व मोठया चौथ-याच्या मधोमध एक अप्रतिम कारंज्याची सोय आहे. जोत्याच्या पोटातही काही खोल्यांची रचना आहे. या मशिदीभोवती पूर्वी वाटोळा उंच तट होता. तो आता दिसत नाही. कंपाऊंडमध्ये सुंदर बगीचा होता आणि समोरच्या. कंपाऊंडमध्ये विहीरही होती. इतकेच नाही, तर मिनारावर सोन्याचा पत्राही होता.आतील भागातील बांधणी भरीव कमानीच्या मध्यमातून केलेली असून छतला उत्तम कोनाडे आहेत.विजापुरात इब्राहिम आदिलशाहची मशीद व मकबरा ,मेहेतर महाल व अंडू मशीद यांच्या तोडीस तोड अशीही मशीद आहे.

मशिदीच्या दर्शनी भागात तीन भव्य कमानी ,छतालागत हस्तांच्या जोडणीने तयार झालेला छज्जा व चारही कोपऱ्यावर अतिशय प्रमाणबद्ध मनोरे आहेत. जमिनी मनोऱ्यावर दगडात कोरलेले साधे पण मनोवेधक नक्षीकाम आहे. छज्जाच्या मध्यभागी छोटे छत्रीवजा घुमट व त्याच्यामागे मशिदीचा भव्य घुमट अशी रचना आहे.

या मशिदीचा जो इतिहास लिहिलेला आढळतो त्याप्रमाणे विजापूरची राजकन्या आयेषाबिबी (मॉसाहेबं) सन १६५९मध्ये मक्केला जाण्यासाठी दाभोळला आली. परंतु हवामान ठीक नसल्याने तिचा पुढील प्रवास होऊ शकला नाही. तिच्या सोबत वीस हजार घोडेस्वार वगैरे फार मोठा लवाजवा होता व लाखो रूपयांची संपत्ती होती. प्रवास रद्द झाल्यावर काय करावे, अशा चिंतेत माँसाहेब असता बरोबर असलेल्या काझी व मौलवींनी सदर धन काही धार्मिक कार्यासाठी खर्च करण्याची तिला सूचना केली. तेव्हा तिने या मशिदीचे काम हाती घेतले व ते चार वर्षे चालू होते. या कामी पंधरा लाख रूपये खर्च आला. ती मशीद कामीलखान नावाच्या शिल्पकाराने बांधली. हे बांधकाम चार वर्ष सुरु होते.

बेगमसाहिबा येथून जाताना त्यांनी मशिदीच्या दैनदिन चर्चासाठी,देखरेखसाठी भोस्ते ,भोपण चिवेली,बहिरवली,कारूळ इसापूर,मुंढर व पांगारीखुर्द ही आठ गावाचे वार्षिक उत्पन्न इनाम म्हणून दिली होती.ही ग्रँट विजापूर सरकारातून मिळत असे.इ.स. १६७० मध्ये छ. शिवाजीनी त्याचे नुतनीकरण केले.त्या मशीदीवर ‘माचेवा’ असे नाव खोदलेले असून ते मशिदीचे मूळ संस्थापक यांचे आहे. ही मशीद प्रार्थनेसाठी फार काळ वापरली गेली नाही स्थानिक मुस्लिम गरीब असल्याने त्यांनी दुरुस्तीकडे लक्ष दिले नाही. इ.स. १८७३ मध्ये तत्कालिन सरकारने आवश्यकदुरुस्तीसाठी थोडेसे अनुदान दिले ( Nairne in ind.Ant.II280=281)

ही कथा मशीदबांधण्याचे वेगळे कारण सांगून ही लोककथा आर्थर क्रॉफर्डच्या ‘द लीजेंड ऑफ कोकण ’ या पुस्तकात (१९०९) ‘ द लीजेंड ऑफ दाभोळ ’ या कथेत तिचा उल्लेख दिल्लीच्या बादशहाची राजकन्या असा आहे चिपळूणच्या राघोबा भटानं पोथीवरून सांगितली अन् आर्थर क्रॉफर्डने लिहून काढली.इ.स.१५९५ सुमारास दिल्लीच्या बादशहाने सातारा ,कुंभार्ली घाटावरून चिपळूण मार्गे दाभोळ आली. ती धार्मिक असल्याने मक्केला हाजी होण्याची इच्छा होती,पण चाच्यांच्या भीतीने किंवा अन्य कारणामुळे तिची हज यात्रा रद्द झाली.बादशहाने तिला दिल्लीला माघारी बोलावले पणदिल्लीला न परतताफत्तेखान नावाच्या आप्ताशी निका लाऊन तिथेच राहिली तीराजकन्यादिल्लीची की विजापूरची याबद्दल इतिहासकरात मतभेद आहेत.मशीद निर्मितीसंदर्भात अजून दोन कथा सांगितल्या जातात.

दुसऱ्या एका कथेनुसार सदर शहजादीला ऋतुदर्शन होईना म्हणून मक्केला जाण्यासाठी ती दाभोळ बंदरात आली. दोनचार दिवसानी ती निघणार तो ऋतू आला मग त्या मक्कावारीसाठी खर्च होण्याच्या पैशातून तिने ही भव्य मशीद बांधली.

तिसरी कथा म्हणजे एका फकिराने त्याच्याकडील एका अंड्यातून जन्मलेल्या एका कोंबडीपासून उत्पन्न झालेल्या अनेक कोंबड्या विकून ही मशीद उभारली. त्यामुळेच या मशिदीला अंडा मशीद असे नाव पडले. या मशिदीचे बांधकाम १५५९ मध्ये सुरु झाले व १५६३ मध्ये पूर्ण झाले अशीही एक इतिहास नोंद सापडते.

**समारोप**

वास्तविक मघ्ययुगीन स्थापत्याचे उदाहरण असलेली हीआयेशाबिबीची / शाही / माँसाहेब मशीदकोकण किनाऱ्यावरील सुस्थितीत असलेली आदिलशाही काळातील एकमेव इमारत आहे. तिच्या निर्मिती बद्दल अनेक कथा असल्या तरी एका राजकन्येनेमशिद वास्तुशास्त्रीय संरचनेनुसार निर्माण करून घेतली.आज ही मशीद महाराष्ट्राच्याआणिदाभोळ इतिहासातील महत्वपूर्ण वास्तू सध्या विस्मरणाच्या गर्तेत आहे. पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी शासनाच्या गृह विभागाकडील निर्णय दिनांक: -८ नोव्हेंबर-१९९६ अन्वये राज्यातील अनेक स्थळांचे अ,ब व क अशा तीन श्रेणीमध्ये वर्गीकरण केले आहेमहाराष्ट्र सरकारच्या प्राचीन वास्तूंच्या संवर्धन मंजूर असलेल्या निधीचा वापर करून तिचे पुनरुज्जीवन करून २ वर्षापूर्वी पुरातत्व विभागाने आवश्यक ती दुरुस्ती करून सुस्थितीत आणली आहे.त्यामुळे सध्या नमाज पढण्यासाठी या मशिदीचा वापर केला जातो. तरीही स्थनिक लोकांच्या मदतीने दाभोळमधील

उत्तम पर्यटन स्थळात रुपांतर करून पर्यटकांना आकर्षित करावे,त्यामुळे दाभोळच्या अर्थकारणालाही चालना मिळेल.मध्ययुगीन स्थापत्याच्या संवर्धन करण्या बरोबर इतिहासही जतन केला जाईल

**संदर्भ ग्रंथ**


१) डॉ.दळवी दाउद , 'माँसाहेबांची मशीद विस्मरणात' पान नं-३४-३७, ऐतिहासिक दाभोळ -वर्तमान व भविष्य,बुकमार्क पब्लीकेशन पुणे ४११००४.

२) शिरगावकर अण्णा, शोध अपरांताचा , बुकमार्क पब्लीकेशन पुणे ४११००४

३) डॉ.टिकेकर अरुण,(स्थलकाल),मौज प्रकाशनगृह मुंबई ४००००४

४) मेहता जे.एल,अनुवादक मा.कृ.पारधी मध्ययुगीन भारताचा बृहत् इतिहास, केसागर प्रकाशन,पुणे ४११०११

५) पं.जोशी महादेवशास्त्री (संपा)., भारतीय संस्कृतिकोश ,अनमोल प्रकाशन,पुणे ४११००२

६) डॉ.दीक्षित लीला (संपा).,कोकण :विविध दिशा आणि दर्शन ,प्रतिमा प्रकाशन ,पुणे ४११०३०


७) Gazetter of the Bombay Presidency -Ratnagiri and Savantvadi Districts -VVOLUME X

८) https://www.maitreegroup.net/2020/06/28/dabhol-and-shahi-masjid-anda-masjid/







Ratnagiri District Gazitter
old edition
page No. 331 Foot Note 2

**Inscription from Dabhol Mosque**

In the name of god, the just the merciful verily Mergues belong to God, so be not co-sharers with him. The rival of this Mergue in colour does not exists in world. The best of well born Governers Pir Ahmad (built this Mergue) in the year 1059 (A.D. 1649) of the Hijra of the prophet on whom be peace and blessings.

❑